05-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/4/2025 10:16 PM Page 1



निवडक



## तुये पंचायत क्षेत्रात धुमाकूळ घातलेला बिबट्या जेरबंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** मागच्या कित्येक महिन्यापासून तुये पंचायत क्षेत्रात बिबट्या वाघाने धुमाकूळ घातला होता. त्यांनी दहशत माजवली होती. अनेक घरातील कुत्र्यांना पळून बळीचे बकरे ठरवले होते. शिवाय गाईच्या वासरानाही त्यांनी बळी ठरवून लोकांमध्ये शेतकऱ्यांमध्ये घबराट पसरवली होती.

या बिबट्या वाघाचा बंदोबस्त वनखात्याने करावा यासाठी लोकांची मागणी होती. त्यानुसार वन खात्याने तुये येथील कृष्णा नाईक यांच्या निवासस्थान परिसरात पिंजरा टाकला होता. त्या पिंजऱ्यात काल रात्री या बिबट्या वाघाला पकडण्यास वन खात्याला यश मिळाले.

---

## 'अनुभवाचे बोल' पुस्तकाचे ११ रोजी प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** आरोबा येथील मांगरिश विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर यांच्या अनुभवाचे बोल या ललितलेख संग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवार दि. ११ रोजी सायंकाळी ३.३० वाजता मिनेझिस ब्रगाझा सभागृह पणजी येथे आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक शशिकांत पुनाजी तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत उपस्थित राहणार आहेत.

---

## ट्रक दरीत कोसळून तीन जवानांचा मृत्यू



**श्रीनगर, दि. ४ :**

जम्मू आणि काश्मीरमधील रामबन येथे रविवारी एक लष्करी वाहन ५०० मीटर खोल दरीत कोसळले. या घटनेत तीन सैनिकांचा मृत्यू झाला. पोलिसांचे म्हणणे आहे की, सुरुवातीच्या तपासात असे दिसते की नियंत्रण सुटल्याने कार खड्ड्यात पडली.सकाळी ११.३० वाजता बॅटरी चष्माजवळ हा अपघात झाला रामबनचे एसएसपी कुलबीर सिंह यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, एक अतिशय दुर्दैवी घटना घडली आहे ज्यामध्ये ताफ्याचा भाग असलेल्या लष्कराच्या वाहनाच्या चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन सुमारे ५०० मीटर खोल दरीत कोसळले.अपघातानंतर लष्कर, पोलिस, एसडीआरएफ आणि स्थानिक स्वयंसेवक आणि तीन सैनिकांनी तातडीने संयुक्त बचाव मोहीम सुरू केली..

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गाडीत तीन जण होते आणि तिघांचाही मृत्यू झाला आहे.एसएसपी कुलबीर सिंह यांनी माहिती दिली की, सुरुवातीच्या तपासात आम्हाला एक नट-बोल्ट सापडला, जो गाडीच्या स्टीअरिंगचा असू शकतो. मात्र, खरी माहिती तपासानंतरच कळेल.

---

## अपार्टमेंट आणि रो-हाऊस प्रकल्पांवर तात्पुरती स्थगिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४ :** सरकार गावाची क्षमता निश्चित करेपर्यंत अपार्टमेंट इमारती आणि रो हाऊसेससारख्या बहु-कुटुंब गृहनिर्माण संकुलांच्या बांधकामावर स्थगिती (तात्पुरती बंदी) आणण्याचा ठराव रविवारच्या नुवे ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. जलद विकासामुळे अत्यावश्यक सेवा आणि स्थानिक पर्यावरणावर कसा ताण येत आहे यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयासंदर्भात सखोल चर्चा झाली, ज्यामध्ये जलद गृहनिर्माण विकासामुळे स्थानिक पाणीपुरवठा, रस्ते आणि पर्यावरणावर निर्माण होणाऱ्या ताणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. जोस आंद्रादे यांनी या ठरावाचे सादरीकरण करताना स्पष्ट केले की, गावाची पायाभूत सुविधा आधीच मर्यादेच्या काठावर आहे. यापुढील मोठे प्रकल्प स्थानिक रहिवाशांच्या हिताला धोका पोहोचवू शकतात.

या ठरावाला ग्रामस्थ कार्मेलिटो अँड्रेड आणि झरीना डी'कुन्हा यांचा पाठिंबा लाभला. सरपंच फ्रेडा डी'सा यांनीही उपस्थितांना आश्वासन दिले की, हा विषय संबंधित अधिकाऱ्यांपुढे तातडीने मांडला जाईल.

गोव्यातील इतर भागांप्रमाणेच नुवे गावातही वाढत्या अनियंत्रित विकासाविरोधात स्थानिक पातळीवर होणाऱ्या आंदोलनाची ही ठळक प्रतिक्रिया आहे. बैठकीदरम्यान पर्यावरणीय ऱ्हासावरही चर्चा झाली. झरीना डी'कुन्हा यांनी साळ नदीच्या पूरप्रवण क्षेत्रातील नुवे अंडरपासजवळ सुरू असलेल्या अनधिकृत भू-भराव आणि बांधकामाचे गांभीर्य अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, या क्षेत्रातील अव्यवस्थित विकास स्थानिक जैवविविधतेला धोका पोहोचवत आहे. या पार्श्वभूमीवर सरपंच डी'सा यांनी स्पष्ट केले की, या कामांसाठी पंचायतकडून कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नाही आणि महामार्ग प्राधिकरणाकडे यासंबंधी स्पष्टीकरण मागवले जाईल.

या बैठकीत झरीना यांनी पंचायत समित्यांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ग्राम विकास समिती आणि जैवविविधता समिती वगळता इतर समित्यांकडून नियमित बैठकांचे आयोजन न केल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी वाहतूक व्यवस्थेवरही चर्चा झाली. केपे येथील रहिवाशांनी होंडा शोरूमजवळील ट्रॅफिक सिग्नलमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीकडे लक्ष वेधले. यावर सरपंचांनी समस्या मान्य करत सिग्नल स्थानांतरित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

याआधी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कोणत्याही हरकतीशिवाय मंजूर करण्यात आले. त्यानंतर २०२४-२५ आर्थिक वर्षासाठीचा प्रशासकीय अहवाल आणि वार्षिक आर्थिक लेखाही सभागृहाच्या संमतीने मंजूर करण्यात आला. पंचायतीच्या आर्थिक बाबींबाबत चर्चा करताना, कर्मचाऱ्यांना किमान वेतन अथवा त्याहून अधिक वेतन देण्याबाबत सदस्यांनी सूचना मांडल्या. यावर सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन सरपंचांनी दिले.

# लईराई जत्रा; शेवटच्या दिवशी भाविकांना प्रवेश बंद

## देवस्थान समितीचा निर्णय | साधेपणाने उत्सवाची सांगता होणार



■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ४ :** शिरगावच्या लईराई देवीच्या जत्रेत शनिवारी पहाटे घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर देवस्थान समितीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या मंगळवारी, ६ मे रोजी होणाऱ्या उत्सवाच्या सांगतेच्या दिवशी भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही, अशी अधिकृत माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष दिनानाथ गावकर यांनी दिली.

शनिवारी पहाटे घडलेल्या घटनेत सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या पार्श्वभूमीवर, त्यांच्या स्मृतीप्रती आदर व्यक्त करण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने, मंगळवारी उत्सवाची सांगता अतिशय साधेपणाने केली जाणार आहे. कोणत्याही भाविकांनी त्या दिवशी शिरगावात येऊ नये, असे कळकळीचे आवाहन समितीने केले आहे.

रविवारी सायंकाळी उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक आणि देवस्थान समितीच्या प्रमुखांची उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत कायदा-सुव्यवस्था, गर्दी नियंत्रण, तसेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यावर चर्चा करण्यात आली. बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, ६ मे रोजी कोणत्याही भाविकाला मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही. संबंधित यंत्रणांनी यासाठी आवश्यक ती प्रशासनिक व्यवस्था उभी केली आहे.

यावर्षी घेतलेला हा निर्णय तात्पुरता असून, पुढील वर्षी योग्य ती खबरदारी घेण्यात येईल. कोणत्याही प्रकारच्या त्रुटी न घडता उत्सव सुरळीत पार पडेल यासाठी प्रयत्न केले जातील, असेही गावकर यांनी स्पष्ट केले. सर्व भाविकांनी प्रशासन आणि देवस्थान समितीला सहकार्य करावे, तसेच ६ मे रोजी शिरगावात दर्शनासाठी येऊ नये, असे आवाहन त्यांनी पुन्हा एकदा केले आहे.

दरम्यान, रविवारी झालेल्या कौलोत्सवासाठी शिरगावात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी झाली होती. सोमवारीही भाविक मोठ्या संख्येने दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गर्दी टाळावी आणि शिस्तीचे पालन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### दोघांची प्रकृती अद्याप गंभीर

**शिरगाव चेंगराचेंगरीतील जखमींपैकी दोघांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघांची प्रकृती सुधारली आहे. त्यांच्या जीवाला आता धोका नाही. आठ जखमींपैकी सहा जणांना म्हापसा येथील अझिलो रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. असे राज्याचे आरोग्य सचिव अरुण कुमार मिश्रा यांनी सांगीतले . शनिवारी सकाळी शिरगावमधील लईराईच्या जत्रेत सहा जणांचा मृत्यू झाला आणि सुमारे ८० जण जखमी झाले. जखमींना साखळी, डिचोली, म्हापसा अझिलो आणि गोवा वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शनिवारी तेरा जखमींना जीएमसीमध्ये दाखल करण्यात आले. शनिवारी त्यापैकी चार जणांची प्रकृती गंभीर होती. गुरुवारी जखमी झालेल्या चारपैकी दोघांची प्रकृती सुधारली आहे. दोघांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. त्यांच्यावर डॉक्टरांच्या विशेष समितीद्वारे उपचार केले जात आहेत . दोन जखमींवर अजूनही अझिलो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती सुधारली आहे.या घटनेनंतर आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी आरोग्य सचिव अरुण कुमार मिश्रा, गोवा वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे डीन डॉ. अरुण कुमार आणि इतरांची भेट घेतली. शिवानंद बांदेकर, वैद्यकीय अधीक्षक; राजेश पाटील, विशेष अधिकारी; राजनंद देसाई आणि इतर विभागप्रमुख या बैठकीत होते . गंभीर जखमींवर उपचार करण्यासाठी डॉक्टरांच्या पथकांची नियुक्ती करण्यात आली. गंभीर जखमींवर होणाऱ्या उपचारांवर पथके लक्ष ठेवून आहेत, असे अरुण कुमार मिश्रा म्हणाले.**

## कॉँक्रीट मिक्सर ट्रकांमधून गळती; अपघाताचा धोका वाढला

■ टीम दैनिक हेराल्ड



**माशेल, दि. ४ :** माशेल भागात कॉँक्रीट मिक्सर ट्रकांमधून रस्त्यावर सतत होणाऱ्या कॉँक्रीट गळतीमुळे स्थानिक रहिवासी त्रस्त झाले असून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या गळतीमुळे रस्ते निसरडे होतात आणि सुकल्यानंतर धूळ उडते, ज्यामुळे पर्यावरण व आरोग्य दोन्ही धोक्यात येतात.

स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, बेतकी आणि माशेल जंक्शनजवळील तीव्र वळणांवर ट्रकमधून ओले कॉँक्रीट, तसेच कॉँक्रीट आणि वाळूच्या मिश्रणाचे थेंब सांडतात. ही गळती विशेषतः ड्रम फिरत असताना होते. ट्रक असंतुलित झाल्यास हे मिश्रण रस्त्यावर पडते, जे दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांसाठी घातक ठरते.

स्थानिक दुकान मालकांनी कुंडई औद्योगिक वसाहतीतील एका खासगी कंपनीच्या ट्रकांचा उल्लेख करत सांगितले की, या ट्रकांमधून होणारी गळती थांबवण्यासाठी कोणतीही दक्षता घेतली जात नाही. ओल्या कॉँक्रीटमुळे दुचाकीस्वार रस्त्यावर घसरून जखमी होतात, तसेच शाळकरी मुले आणि वृद्ध पादचारीदेखील या समस्येने त्रस्त आहेत.

स्थानिक पंचायतीने यापूर्वीही संबंधित कंपनीला यासंदर्भात कळवले आहे. मात्र समस्येचे निराकरण अद्याप झालेले नाही. स्थानिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, गळती रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात आणि रस्त्यांची नियमितपणे स्वच्छता केली जावी.

## कार दुभाजकावर आदळली; कुटुंब बचावले

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. ४ :** फार्मागुडी येथील ढवळी मार्गावर रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास एक अपघाताची घटना घडली. कर्नाटकमधील एका कुटुंबाच्या कारचे अचानक नियंत्रण सुटल्याने ती रस्त्याच्या कडेला असलेल्या दुभाजकावर चढली. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही.

अपघाताचे नेमके कारण सांगताना कारमधील सदस्यांनी माहिती दिली की, अचानक एक भटका कुत्रा रस्त्यावर आल्याने चालकाने ब्रेक दाबले, ज्यामुळे वाहनाने नियंत्रण गमावले. ही घटना कुटुंब शिरोडा येथील कामाक्षी मंदिरात दर्शन घेऊन म्हार्दोळकडे परतत असताना घडली. वाहन दुभाजकावर तसेच खराब स्थितीतील वाहतूक सिग्नलच्या खांबांवर आदळले. यामुळे वाहनाचे काहीसे नुकसान झाले. अपघातस्थळी तत्काळ स्थानिक नागरिकांनी मदतीचा हात दिला.

स्थानिक नागरिकांनी यावेळी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले की, फार्मागुडी परिसरातील तीव्र वळणं आणि ट्रक पार्किंगमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. विरोधी बाजूकडून येणाऱ्या वाहनांची अचानक ओळख होणे कठीण असल्यामुळे अशा अपघातांचे प्रमाण वाढले आहे.प्रशासनाने या मार्गावर तातडीने योग्य ती वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षाविषयक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## बिट्स पिल्लानी; विद्यार्थ्यांच्या आत्महत्येनंतर धोरणात बदल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** तीन विद्यार्थ्यांच्या दुर्दैवी आत्महत्यांनंतर, बिट्स पिल्लानी गोवा कॅम्पसने त्यांच्या अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याची घोषणा केली आहे. संस्थेने रविवारी जाहीर केले की विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दबाव कमी करण्यासाठी, मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या बाबतीत सुधारित अभ्यासक्रमाचा समावेश केला जाईल. याशिवाय, तणावाखाली असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी अधिक वेळ दिला जाईल.

संस्थेच्या वतीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही विद्यमान अभ्यासक्रमात सुधारणा करत आहोत आणि विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सामग्री सुलभ करण्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिक ताण कमी करण्यासाठी वैयक्तिकृत समर्थन देण्यात येईल. विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिक आरोग्य, ताण व्यवस्थापन यावर आधारित नवीन अभ्यासक्रम प्रदान केले जातील. तसेच, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी एक डॅशबोर्ड विकसित केला जात आहे, ज्याद्वारे वेळेवर हस्तक्षेप आणि मदतीची सुविधा उपलब्ध होईल.

निवेदनात हे देखील नमूद करण्यात आले की, विद्यार्थ्यांना त्यांच्या मानसिक तणावाचे संकेत ओळखून, मदतीसाठी संपर्क साधावा लागेल. थेरपीची प्रक्रिया, कुटुंब आणि प्रियजनांशी संवाद यावर विश्वास ठेवावा. मदत घेणे हे कमकुवतपणाचे लक्षण नाही, तर हे आत्म-जागरूकता आणि मानसिक ताकदीचे प्रतीक आहे. जर तुम्हाला मानसिक संघर्ष जाणवू लागला, तर कृपया मदतीसाठी बोला. मदत उपलब्ध आहे आणि तुम्हाला एकट्याने याचा सामना करावा लागणार नाही. गोव्यातील बिट्स पिलानी कॅम्पसमधील २० वर्षीय विद्यार्थी कृष्णा कासेरा, जो लखनऊ येथील रहिवासी होता, त्याने गेल्या आठवड्यात आत्महत्या केली. यापूर्वी ५ मार्च २०२५ रोजी २० वर्षीय विद्यार्थी अथर्व देसाई त्याच्या वसतिगृहाच्या खोलीत मृतावस्थेत आढळला होता.

## आगोंद ते काणकोण रस्त्यावर पडलेले झाड हटवले

### धोकादायक झाडांपासून रस्ता सुरक्षीत करा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ४ :** आगोंद ते काणकोण मुख्य रस्त्यावर 'दुमाणे' याठिकाणी असलेले धोकादायक झाड शनिवारी रात्री ११.१५ वा. कोसळले. ही घटना दिवसा घडली असती तर नेहमी वर्दळीच्या या रस्त्यावर मोठी दुर्दैवी घटना घडली असती. सदर घटनेची माहिती मिळताच काणकोण अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी पोहोचले व कटरच्या सहाय्याने झाड हटवून वाहतूक सुरळीत केली. अशी माहिती दलाच्या सुत्रांकडून देण्यात आली.

झाड कोसळून वाहतूक खोळंबली असल्याची माहिती मिळताच अगोदरचे सरपंच नीलेश पागी तातडीने घटनास्थळी पोहोचले व अग्निशमन दलाच्या जवानांना आवश्यक मदत केली. अग्निशमन दलाच्या जवानांच्या कामाचे यावेळी त्यांनी कौतुक केले.

गेल्या आठवड्यात असेच एक मोठे झाड श्रीस्थळ येथे सकाळच्या वेळेत मुख्य रस्त्यावर कोसळून दुचाकी वर कोसळले होते. यावेळी



**काणकोण : आगोंद ते काणकोण मुख्य रस्त्यावर दुधाचे येथे पडलेले धोकादायक झाड झाड हटविताना अग्निशामक दलाचे जवान.**

दुचाकीचालक व एक अन्य स्वार, असे दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यावेळी रस्त्याकाठी असलेल्या धोकादायक झाडांच्या प्रश्नासंदर्भात स्थानिक नागरिकांनी पंचायत व आपत्कालीन व्यवस्थापन संदर्भात नाराजी व्यक्त केली होती. पावसाळ्यापूर्वी आपत्कालीन व्यवस्थापन समितीने कृतीशील होणे आवश्यक असून अशा धोकादायक झाडांच्या फांद्याची छाटणी करावी. रस्ता वाहतूक सुरळीत करावी अशी मागणी व्यक्त होत आहे.

## वाढत्या दरांमुळे पर्यटन व्यवसाय धोक्यात !

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४ :** गोव्यातील पर्यटन क्षेत्रास सध्या वाढत्या किंमतीमुळे धोका निर्माण झाला असून, या अनिश्चित प्रवृत्तीने राज्याचा पर्यटन व्यवसाय अडचणीत येऊ शकतो, असा स्पष्ट इशारा वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांनी दिला आहे. कोलवा येथे शुक्रवारी पर्यटन विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मंत्री गुदिन्हो यांनी टॅक्सी सेवा, विमान कंपन्या आणि हॉटेल व्यवसायातील वाढत्या दरांवर चिंता व्यक्त केली. गोव्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र जास्त दर आकारण्याची प्रवृत्ती दीर्घकालीन नुकसानकारक ठरू शकते, असे ते म्हणाले.

जास्त किंमतीमुळे पर्यटक पर्यायांचा विचार करू शकतात. त्याचा परिणाम गोव्याच्या पर्यटनावर होणार आहे. आपल्या लोकप्रियतेवर विश्वास ठेवून आपण निष्काळजी होऊ शकत नाही,असे गुदिन्हो यांनी ठामपणे सांगितले. ते पुढे म्हणाले की, गोव्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्रात एक मजबूत स्थान निर्माण केले असले तरी, सध्या आत्मसंतुष्टतेची भावना निर्माण होताना दिसत आहे. आपण एक नंबर वन पर्यटन स्थळ आहोत, जगभरातून चार्टर्ड उड्डाणे गोव्यात येतात, देशभरातून पर्यटक येतात. मात्र, या यशामुळे आपण निष्क्रिय होऊ लागलो आहोत, याची जाणीव ठेवली पाहिजे, असा इशाराही त्यांनी दिला.

गेल्या काही महिन्यांतील पर्यटकांची घटती संख्या ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही या आकड्यांवर समाधानी नाही. ही वेळ एकत्र येऊन काम करण्याची आहे, असे सांगून त्यांनी सर्व हितधारकांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सरकार अंतर्गत भागांमध्ये पर्यटन वाढवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा उल्लेख करीत गुदिन्हो यांनी सांगितले की, राज्यातील पर्यटन केवळ किनाऱ्यापुरते मर्यादित न ठेवता गावागावात विस्तारले पाहिजे. पर्यटन वाढावे, अधिक पर्यटक गोव्यात यावेत, स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात - हे आपण सर्वांनी मिळून साध्य करायला हवे, असे म्हणत त्यांनी समन्वय, जबाबदारी आणि सहकार्याच्या भावनेचा पुनरुच्चार केला.